महाराष्ट्र शासनाचा २००३-२००४ या वर्षाचा
अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

# वित्त मंत्री श्री. जयंत पाटील

यांनी गुरुवार, दिनांक २० मार्च २००३ रोजी
केलेले भाषण

## भाग दुसरा

**सुधारित अंदाज २००२-२००३**

१. गेल्या मार्चमध्ये २००२-२००३ चा अर्थसंकल्प सादर करतांना रु. ३४४.९५ कोटींची तूट राहील असा अंदाज व्यक्त केला होता. सुधारित अंदाजात रु. ९७.६७ कोटींची तूट दिसते. वर्षारंभीची रु. १२३.०६ कोटींची प्रत्यक्ष उणे शिल्लक हिशेबात घेतल्यास वर्ष अखेरची तूट रु. २२०.७३ कोटी होईल.

**अर्थसंकल्पीय अंदाज २००३-२००४**

२. सन २००३-२००४ च्या संकल्पामध्ये पुढे दर्शविल्याप्रमाणे रु. १,४२६.३२ कोटी तूट राहील असा अंदाज आहे :—

(रुपये कोटीत)

| | |
|---|---|
| (अ) महसुली विभाग— | |
| जमा | ३८,२९३.४५ |
| खर्च | ४२,८३४.५४ |
| तूट | ४,५४१.०९ |
| (ब) भांडवली विभाग— | |
| जमा | २२,७७८.३१ |
| खर्च | १९,६२७.४८ |
| शिल्लक | ३,१५०.८३ |
| (क) लोकलेखा (निव्वळ) | १,२९५.३६ |
| (इ) जमा (अ + ब + क) | ६२,३६७.१२ |
| (फ) खर्च (अ + ब) आणि अर्थसंकल्पात समाविष्ट न झालेला रु. १,११०.६९ कोटींचा योजनांतर्गत नियतव्यय | ६३,५७२.७१ |
| तूट | १,२०५.५९ |
| सुरूवातीची शिल्लक (–) | २२०.७३ |
| एकूण तूट | १,४२६.३२ |

३. वर निर्देशित केलेली तूट सन २००३-२००४ चा रुपये ५,८५५ कोटींचा कोअर प्लॅन विचारात घेता, अपेक्षित आहे. मात्र सन २००३-२००४ च्या एकूण अर्थसंकल्पित करावयाच्या योजनेचे आकारमान रुपये ७,२२५ कोटी निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे उर्वरित रुपये १,३७० कोटी नियत व्यय सप्टेंबर-ऑक्टोबर २००३ च्या दरम्यान साधनसंपत्ती व अतिरिक्त खर्चाचा आढावा घेऊन अर्थसंकल्पित करण्याचा माझा मानस आहे. रुपये ४५३ कोटी अतिरिक्त साधनसंपत्तीचा विनियोग तूट भरुन काढण्यास करण्यात येईल.

देशातील अप्रत्यक्ष करप्रणालीतील सुधारणा

४. १ एप्रिल २००३ रोजी देशातील राज्ये अप्रत्यक्ष करप्रणालीमध्ये सुधारणा आणि सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीकोनातून एक अतिशय महत्वाचे पाऊल उचलणार आहेत. या अनुषंगाने राज्यामध्ये एकस्तरीय विक्रीकर प्रणाली बदलण्यात येणार असून त्या बदल्यात एकसमान मूल्यवर्धित कायदा आणण्याचे योजिले आहे. माझे स्वतःचे असे मत आहे की, यामुळे देशाची आणि राज्यांची आर्थिक परिस्थिती बळकट होण्याच्या दृष्टीने मदतच होणार आहे. इतर स्पर्धकांच्या तुलनेत भारतामध्ये अप्रत्यक्ष कराचे दर जास्त असल्याने भारताची उत्पादन क्षेत्रात पिछेहाट झालेली आहे. मात्र यापुढे राज्यामध्ये एकसमान मूल्यवर्धित कायदा अंमलात आल्यामुळे अप्रत्यक्ष करांचे दर आटोक्यात येऊन भारतीय उत्पादकाला जगाच्या इतर कुठल्याही उत्पादकाशी स्पर्धा करणे शक्य होईल असा मला विश्वास आहे.

मुल्यवर्धित कराचे आर्थिक परिणाम

५. भारतासारखा खंडप्राय देश मूल्यवर्धित कर प्रणालीसारख्या समान सुत्राने जोडला जात आहे याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटेल. मूल्यवर्धित कर प्रणालीमुळे आर्थिकदृष्ट्या दोन परिणाम होतात. एक म्हणजे जगाच्या पाठीवर ज्या देशात

व्हॅट प्रणाली अस्तित्वात आली त्या देशाची आर्थिक प्रगती झाल्याचा अनुभव आहे. दुसरे असे की समान कर प्रणालीमुळे देशात एकत्रीत बाजारपेठ (Common Market) तयार होईल. त्यामुळे राज्याराज्यामधील गुंतवणुक करांच्या दरांवर अवलंबून न राहता राज्यामधील उपलब्ध सेवा व सुविधा यांच्यावर अवलंबून राहील.

उत्तम शासन

६. एकसमान करप्रणालीतील एकसमान कराच्या बंधनामुळे नागरीकांवर लावण्यात येणाऱ्या करांच्या दरांवर मर्यादा राहिल. मला असे सुचवावेसे वाटते की, त्यामुळे प्रत्येक राज्याचा नागरीकांना चांगली सेवा पुरविण्याकडे कल वाढेल आणि त्यामुळे राज्याच्या महसूलात वाढ होऊ शकेल. नवीन करप्रणालीमध्ये ग्राहक व करदात्यांशी शासनाचे सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण झाल्यामुळे आर्थिक भरभराट आणि महसूलात वाढ झाल्याचे दिसून येईल.

नवीन करप्रणालीची सुरुवात

७. दिनांक १ एप्रिल २००३ पासून राज्यात अंमलात येणारी मूल्यवर्धित करप्रणाली सद्य:स्थितीला अस्तित्वात असलेल्या विक्रीकर प्रणालीपेक्षा वेगळी राहणार आहे. या नवीन करप्रणालीविषयक महत्वाच्या बाबी मी सन्माननीय सभासदांच्या, करदात्यांच्या व ग्राहकांच्या माहितीस्तव मांडत आहे.

नोव्हेंबर १९९९ च्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेतील निर्णय

८. मा. केंद्रिय अर्थमंत्री यांनी आयोजित केलेल्या दिनांक १६ नोव्हेंबर १९९९ च्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत विक्रीकर सुधारणा व समानता आणण्याच्या दृष्टीने तीन महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. या परिषदेमध्ये उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी कुठलीही विक्रीकरविषयक सवलत देण्यात येऊ नये याबाबत एकमत झाले. याशिवाय सर्व राज्यांनी २०० पेक्षा जास्त महत्वपूर्ण वस्तूंसाठी कराचे किमान दर अंमलात आणण्याचे

ठरले. तसेच सर्व राज्यांनी मूल्यवर्धित कर कायदा अंमलात आणावा असा निर्णय झाला.

राज्यांच्या अर्थमंत्र्यांची गठीत शक्तीप्रदत्त समिती

९. याच परिषदेमध्ये असाही निर्णय झाला की, मूल्यवर्धित कायद्याबाबत सर्व राज्यांमधील तरतूदीमध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीकोनातून अर्थमंत्र्यांची शक्तीप्रदत्त समिती स्थापन करण्यात यावी. या निर्णयाच्या अनुषंगाने गठीत केलेल्या शक्तीप्रदत्त समितीच्या वेळोवेळी बैठका घेण्यात आल्यात आणि यामध्ये विविध महत्वपूर्ण विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. याच निर्णयाच्या अनुषंगाने राज्य शासनाने १ जानेवारी २००० पासून विक्रीकर आधारित प्रोत्साहनाची अंमलबजावणी बंद केली. तसेच निर्देशित वस्तुंवर एकसमान न्यूनतम विक्रीकर दर राज्यात लागू करण्यात आले. शक्तीप्रदत्त समितीने घेतलेल्या विविध निर्णयांचा डिसेंबर २००२ च्या हिवाळी अधिवेशनातील सादर करण्यात आलेल्या विधेयकामध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

विक्रीकर कायद्यांचे विलीनिकरण

१०. विक्रीकराच्या कायद्यात सुटसुटीतपणा आणण्याच्या दृष्टीकोनातून अस्तित्वात असलेल्या विविध विक्रीकर कायद्यांचे विलीनिकरण करण्यात येईल. या अनुषंगाने मुंबई विक्रीकर अधिनियम, मोटार स्पिरीट विक्रीवरील कर अधिनियम, ऊस खरेदी कर अधिनियम, हक्क हस्तांतरण कर अधिनियम व कार्यकंत्राट कर अधिनियम निरसित करण्यात येत असून यातील तरतूदी अंमलात येणाऱ्या मूल्यवर्धित कायद्यात करण्यात येत आहेत.

नोंदणीकरिता किमान उलाढाल

११. सद्य:स्थितीला जे व्यापारी उत्पादक आहेत किंवा राज्याबाहरून मालाची आयात करतात अशा व्यापाऱ्यांसाठी नोंदणीकरिता खरेदी आणि विक्रीची उलाढाल किमान रु. १ लक्ष आणि इतर व्यापाऱ्यांच्या बाबतीत रु.२.५ लक्ष एवढी ठेवण्यात

आलेली आहे. छोटया व्यापाऱ्यांना सुट देण्याच्या दृष्टीने जे व्यापारी राज्यात माल आयात करीत नाहीत त्यांच्याबाबतीत ही मर्यादा रु. १० लक्ष इतकी करण्याचे मी ठरविले आहे. मात्र आयातदारांच्याबाबतीत ही मर्यादा रु. १ लक्ष इतकीच राहणार आहे. ज्या व्यापाऱ्यांची उलाढाल या मर्यादेपेक्षा कमी आहे अशा व्यापाऱ्यांचा नोंदणी दाखला रद्द करण्याचे मी ठरविले आहे.

सर्व राज्यात समान वस्तुंची व समान कर दरांची यादी.

१२. अर्थमंत्र्यांच्या समितीने वस्तुंची वर्गवारी तयार केली आणि प्रत्येक वस्तुसाठी कराचे दर निश्चित केले. ही तयार केलेली वस्तुंची यादी व करांचे दर यांचा सर्व राज्यांचे मुल्यवर्धित कर कायद्यामध्ये समावेश करावा असा महत्वपूर्व निर्णय घेण्यात आला. राष्ट्रीय बाजारपेठांच्या एकत्रिकरणासाठी हे अतिशय महत्वाचे पाऊल आहे असे मला वाटते.

कमीतकमी दरांची संख्या

१३. अर्थमंत्र्यांच्या शक्तीप्रदत्त समितीने असाही निर्णय घेतला की, नवीन करप्रणालीमध्ये मुख्यत्वे कराचे दोनच दर राहतील. ते म्हणजे ४ टक्के आणि प्रमाणित दर. महत्वाचा औद्योगिक कच्चा माल आणि रोजच्या वापरातील काही वस्तुंवर ४ टक्के दराने कर आकारण्यात येईल. काही अपवादात्मक वस्तु वगळता इतर वस्तुंवर प्रमाणित दराने कराची आकारणी करण्यात येईल. या अपवादात्मक वस्तुंमध्ये करमुक्त वस्तु, मद्य, पेट्रोल, डिझेल, ए.टी.एफ., बुलियन, ज्वेलरी व मौल्यवान खडे यांचा समावेश राहील. करमुक्त असणाऱ्या वस्तुंची यादी सर्व राज्यांमध्ये समान राहणार आहे. मोटार स्पिरीट आणि मद्य यावर न्युनतम कराचा दर २० टक्के आणि सद्य:स्थितीप्रमाणेच जास्त दराने कराची आकारणी करण्याची राज्यांना मुभा राहील. बुलियन, ज्वेलरी व मौल्यवान खड्यांवर १ टक्का दराने कराची आकारणी होईल.

केंद्र सरकारतर्फे या विधेयकाला संमती देतांना स्पष्ट करण्यात आले की, शक्तीप्रदत्त समितीने निश्चित केलेल्या दरानेच राज्यात वस्तुंवर कर लावण्यात यावेत.

प्रमाणित दर **१४.** ज्या वस्तु मूल्यवर्धित कर विधेयकामधील सोबत असलेल्या अनुसूचितील कुठल्याही भागात दर्शविलेल्या नाहीत अशा वस्तुंवर प्रमाणित दराने कराची आकारणी करण्यात येईल. शक्तीप्रदत्त समितीच्या निर्णयाप्रमाणे हा प्रमाणित दर १२.५ टक्के राहिल. सद्य:स्थितीला असलेल्या बऱ्याच वस्तुंवरील १५.३ टक्के दराच्या मानाने हा दर बराच कमी आहे.

कराची वजावट **१५.** नवीन करप्रणालीत कमी प्रमाणित दरासोबतच खरेदीवरील कराची संपूर्ण वजावट देण्यासंदर्भात तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. भांडवली वस्तु आणि व्यवसायासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या खरेदीवरील कराची पूर्ण वजावट मिळणार आहे. फक्त काही प्रकरणातच वजावटीची रक्कम कमी करण्यात येणार आहे. त्यामध्ये उत्पादित केलेला माल परराज्यातील शाखेला पाठविला असल्यास किंवा कच्च्या मालाचे करमुक्त वस्तुंच्या उत्पादनात वापर केला असल्यास ४ टक्केपेक्षा जास्त असलेल्या कराची वजावट मिळेल.

वजावटीस पात्र नसलेल्या वस्तु **१६.** नवीन करप्रणालीत वजावट मिळण्याबाबत काही अपवाद राहणार आहेत. जसे प्रवासी वाहने जर कॅपिटलाईज्ड करण्यात आल्या असतील तर त्या संदर्भात कुठलीही वजावट मिळणार नाही. तसेच पेट्रोल आणि डिझेल यांचा कुठेही वापर केला तरी वजावट मिळणार नाही. तसेच पेट्रोलियम रिफायनरीजमध्ये वापरण्यात येणाऱ्या क्रुड ऑईलवर पण वजावट मिळणार नाही.

३१ मार्च २००३ रोजी असलेल्या मालावर वजावट

**१७.** उत्पादक व इतर व्यापाऱ्यांकडे ३१ मार्च २००३ रोजी मालाचा साठा असण्याची शक्यता आहे. अशा वस्तुंबाबत केलेल्या खरेदीवर भरलेल्या कराची वजावट देण्यात येईल असे मी प्रस्तावित करतो. उत्पादक सद्या खरेदी केलेल्या मालावर कराची वजावट माल खरेदी केल्यावर लगेचच करतात. सद्यःस्थितीला व्यापारी फेरविक्री करतांना विक्रीकर लावत नाही किंवा शासनाकडे कराचा भरणा करीत नाही. मात्र नवीन कर प्रणालीमध्ये व्यापाऱ्यांना बिलामध्ये कराची रक्कम वेगळी दाखवावी लागेल. अशा मालाची १.४.०३ व त्यानंतर विक्री केल्यास खरेदीवर भरलेल्या कराची वजावट मिळेल. यासाठी ३१ मार्च २००३ रोजी असलेल्या ट्रेडिंग गुडस् आणि त्यामध्ये असलेल्या कराचा तपशील व्यापाऱ्याला सादर करावा लागेल. आणि जुलै २००३ पासून एकसमान सहा मासिक हप्त्यात त्याबाबतची वजावट मिळेल असे मी प्रस्तावित करतो.

कर सवलती

**१८.** सद्यःस्थितीला मुंबई विक्रीकर कायद्यांन्वये अधिसूचनेद्वारे विविध वस्तुंना, संस्थांना आणि औद्योगिक घटकांना विक्रीकरात सवलत देण्यात येते. नवीन करप्रणालीत राष्ट्रीय पातळीवर झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कुठल्याही प्रकारच्या विक्रीकर विषयक सवलती देता येणार नाहीत. मात्र केंद्र शासनाने जाहिर केलेल्या योजनेअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रातील घटक, १०० टक्के निर्यातभिमुख घटक आणि केंद्र शासनाने पुरस्कृत केलेले इतर निर्यात घटक यांच्याबाबतीत करमाफी देण्यात येईल.

निर्धारणा

**१९.** सद्या सर्व व्यापाऱ्यांची निर्धारणा प्रत्येक वर्षी करण्यात येते. मात्र नवीन कर प्रणालीमध्ये व्यापाऱ्यांच्या स्वयंनिर्धारणेवर भर देण्यात येईल. ज्या व्यापाऱ्याची खरेदी किंवा विक्रीची

उलाढाल वर्षभरात रु. ४० लाखापेक्षा अधिक झाली आहे अशा प्रकरणात सनदी लेखापालाकडून (Chartered Accountant) लेखा परीक्षण करून घेणे बंधनकारक राहणार आहे.

लेखापरीक्षण

२०. नवीन करप्रणालीत व्यापाऱ्यांनी सादर केलेली विवरणपत्रे ठरविलेल्या निकषाच्या आधारे तपासण्यात येतील. यापैकी काही प्रकरणे लेखापरिक्षणासाठी निवडली जातील. लेखापरिक्षण व्यापाऱ्याच्या व्यवसायाच्या ठिकाणीच पूर्वसूचना देऊन करण्यात येईल.

प्रशासनातील बदल

२१. नवीन करप्रणालीच्या अनुषंगाने विक्रीकर विभागाची पुनर्रचना करण्यात येणार आहे. सद्यःस्थितीला निर्धारणेला महत्व दिले जाते व विभागाची रचना त्यावर आधारित आहे. मात्र नवीन प्रणालीत विवरणपत्राची छाननी, लेखापरीक्षण, वसूली यांवर लक्ष केंद्रित करण्याचे मी योजिले आहे. पुनर्रचनेच्या कामात मदत करण्यासाठी जागतिक अनुभव असलेल्या तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली आहे. विभागातील अधिकारी आणि कर्मचारीवर्ग यांना मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच सन्माननीय सदस्यांना सांगण्यास मला आनंद होतो की, विक्रीकर विभागाचे संगणकीकरण प्रगतीपथावर आहे.

सामुहिक प्रोत्साहन योजना

२२. मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत सन २००० नंतर विक्रीकरविषयक कुठलीही प्रोत्साहने देण्यात येऊ नयेत असा निर्णय झाला होता. सद्या बऱ्याच घटकांना करमाफी किंवा करविलंबन या पध्दतीने प्रोत्साहने मिळतात. ज्या घटकांना विक्रीकर प्रोत्साहन मिळाले आहे अशा घटकांना या पुढेही सध्या उपलब्ध असलेले प्रोत्साहन त्याच पद्धतीप्रमाणे चालू राहील असे मी ठरविले आहे. प्रोत्साहन योजनेखालील सर्व घटकांना कच्च्या मालाच्या खरेदीवर कर भरावा लागेल. परंतु खरेदीवर

भरलेल्या करांचा परतावा विक्रीवरील कराशी समायोजित करण्याऐवजी रोखीने मिळेल. मात्र प्रोत्साहित घटकांनी खरेदी केलेल्या कच्च्या मालाच्या किंमतीच्या ४ टक्के इतकी रक्कम उपलब्ध असलेल्या एकूण प्रोत्साहनाच्या रकमेतून कमी करण्याची पध्दत चालू ठेवण्यात येईल. ज्या घटकांनी करमाफीचा पर्याय निवडला आहे त्यांना करमाफीचा पर्याय चालू राहील. मात्र उत्पादनानंतर झालेल्या विक्रीतील वाढलेल्या किंमतीवर मूल्यवर्धित कर आकारण्यात येईल.

आपसमेळ योजना (Composition Scheme)

२३. नवीन कायदा सर्व व्यापा-यांसाठी लागू असला तरीही काही व्यापारी वर्गासाठी आपसमेळ योजना राबविण्याचे मी ठरविले आहे. या योजनेमध्ये किरकोळ व्यापारी–जे शेवटच्या टप्प्यावर ग्राहकांना विक्री करतात–तसेच सद्य:स्थितीला असलेल्या योजनेप्रमाणे रेस्टॉरंटस् यांना या योजनेचा लाभ घेता येईल. कंत्राटदार आणि किरकोळ औषध विक्रेते यांनासुध्दा ही योजना लागू राहिल. याशिवाय पेट्रोल, डिझेल, एल.पी.जी. व सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधून विक्री करण्यात येणारे केरोसिन यांच्यासाठी आपसमेळ योजना मी प्रस्तावित करतो. वरील व्यापाऱ्यांकरिता ही योजना बंधनकारक राहणार नाही. परंतु या योजनेचा लाभ घेतल्यास याबाबतचा कर ग्राहकाकडून वेगळा वसूल करता येणार नाही, कुठल्याही प्रकारची वजावट मिळणार नाही व सर्व खरेदी ही महाराष्ट्रातूनच कर भरून केलेली असावी.

नवीन कायद्याखालील महसूल

२४. सद्य:स्थितीला ४ टक्के कर असणाऱ्या वस्तु वगळता इतर वस्तुंवर पूर्ण वजावट दिल्यास अंदाजे १७.५ टक्के या दराने विक्रीकराचा महसूल मिळतो. मात्र मूल्यवर्धित करप्रणालीत प्रमाणित दर १२.५ टक्के हा घोषित करण्यात आला आहे. त्यामुळे एकूण महसूलात घट होण्याची शक्यता आहे. याच

अनुषंगाने मालाच्या किंमतीतही घट होईल व किंमतीतील फरकाचा फायदा ग्राहकांना मिळेल अशी मी अपेक्षा करतो. राज्याला होणाऱ्या महसूलाच्या अपेक्षित हानी संदर्भात शक्तीप्रदत्त समितीच्या बैठकीत आणि केंद्र शासनासोबत चर्चा झालेली आहे. याबाबत केंद्र शासन होणा-या हानी संदर्भात आर्थिक मदत करण्यास तयार आहे. याच अनुषंगाने केंद्र शासनाने राज्यांना साखर, तंबाखू आणि कापड यावर ४ टक्के दराने विक्रीकराची आकारणी करण्यासंदर्भात अधिकार देण्याचे मान्य केले आहे. तसेच राज्यांना सेवाकर लावू देण्याबाबत केंद्र शासनाने तत्वतः मान्य केले आहे. याबाबतचे अधिकार मिळाल्यावर राज्य शासनाची महसूलाची तूट काही प्रमाणात भरून निघणार आहे. राहिलेली आर्थिक तूट केंद्र शासनाने पुढील ३ वर्षात १०० टक्के या दराने अनुदानित करावी अशी मागणी राज्यातर्फे प्रदत्त समितीने केंद्र शासनाकडे केली. मात्र केंद्र शासनाने प्रथम वर्षाकरिता १०० टक्के, द्वितीय वर्षाकरिता ७५ टक्के तर तृतीय वर्षाकरिता ५० टक्के इतकी भरपाई ठरविलेल्या निकषाच्या आधारे देण्याबाबत संमती दर्शविलेली आहे.

केंद्रीय विक्रीकर कायदा

**२५.** मा. सदस्यांना माहितच आहे की, जवळजवळ तीन दशकांपासून आंतरराज्य विक्रीबाबत प्रमाणपत्र सादर केले असल्यास ४ टक्के दराने कराची आकारणी होते. महाराष्ट्र राज्याला या कराद्वारे बऱ्याच मोठया प्रमाणात महसूल प्राप्त होतो. केंद्रीय विक्रीवर कर आकारणी ही मूल्यवर्धित करप्रणालीशी सुसंगत नाही यामुळे नवीन प्रणालीमध्ये काही राज्यांनी केंद्रीय विक्रीकराचा दर तत्काळ २ टक्के करण्यात यावा अशी मागणी केली होती. त्या अनुषंगाने मा. केंद्रीय अर्थमंत्र्यांनी केंद्रीय विक्रीकराचा दर २ टक्के करण्याचे २००३-२००४ च्या

अर्थसंकल्पिय भाषणात जाहिर केले आहे. तथापि, या दराची अंमलबजावणी केंद्र सरकारने अधिसूचित केलेल्या तारखेपासून होईल. त्यामुळे महाराष्ट्राला मिळणाऱ्या महसूलात मोठी हानी होणार आहे. त्यामुळे केंद्र शासनाने पुढील ३ वर्षात १०० टक्के याबाबतची भरपाई करावी अशी भूमिका राज्यातर्फे घेण्यात आली. त्या अनुषंगाने मा. केंद्रीय अर्थमंत्र्यांनी पहिल्या २ वर्षात १०० टक्के भरपाई मान्य केलेली असून दुसऱ्या वर्षी पुनर्विलोकन करण्याचे ठरविले आहे.

व्यवसाय कराच्या भिलेखाचे ग्रयावतीकरण

२६. सध्या पगारदार कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त स्वयं रोजगार असलेले व्यावसायिक व्यवसायकर भरण्यास पात्र आहेत. व्यवसायकर कायद्यांतर्गत ६५ वर्षावरील व्यक्तींना व्यवसायकर भरण्यापासून सूट मिळते. तथापि ही व्यक्ती स्वतःची नाव नोंदणी रद्द करून घेत नाही म्हणून अशा व्यक्तींची नोंदणी विभागाकडे चालू राहते. मी मागील वर्षी जाहिर केल्याप्रमाणे शिक्षित बेरोजगार महिला व अल्पबचत एजंट यांना वसूलीकरिता पाठपुरावा करण्यासाठी व नवीन करदाते शोधण्यासाठी नियुक्त केले आहे. तथापि, सर्वेक्षणामध्ये असे लक्षात आले की, अशा व्यावसायिकांनी एकतर व्यवसाय बंद केला आहे किंवा ते त्या ठिकाणी राहत नाहीत. म्हणून व्यवसायकरदात्यांचा अभिलेख अद्ययावत करण्याचा माझा प्रस्ताव आहे. त्याकरिता अतिरिक्त संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सेवा वापरण्याचा माझा प्रस्ताव आहे. शासकीय पातळीवर वेगवेगळया संघटनांशी व संस्थांशी प्रशासनाचा संबंध येतो. अशा संघटनांकडून व संस्थांकडून व्यवसायकर भरल्याची खात्री झाल्याशिवाय त्यांना कुठलेही परवाने, कंत्राट किंवा रक्कम अदा केली जाणार नाही याबाबत प्रशासनिक काळजी घेण्यात येईल.

व्यवसाय करांतर्गत प्रशासकीय उपाय योजना.

**२७.** मा. सदस्यांना सांगण्यास आनंद होत आहे की, व्यवसायकरात दरवाढ प्रस्तावित नाही. तथापि, कर वसूली वाढविण्याकरिता प्रशासकीय उपाययोजना करण्याचा माझा मानस आहे. प्रस्तावित केल्याप्रमाणे अतिरिक्त संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सेवेचा वापर करून व्यवसायकराच्या महसूलात वाढ होण्याच्या दृष्टीने मी या कामासाठी एका भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्याची नेमणूंक करण्याचेही प्रस्तावित करीत आहे.

मुंबई विक्रिकर अधिनियमात सुधारणा

**२८.** मुंबई विक्रिकर कायद्यातील निर्धारणा ३ वर्षात करणे बंधनकारक आहे. परंतु राज्यात मूल्यवर्धित कायदा अंमलात येत असल्याने सुरूवातीच्या कालावधीत अतिरिक्त कामाचा भार वाढणार आहे. त्यामुळे १ एप्रिल १९९९ पासून सुरू होणाऱ्या कालावधीतील कालबाह्य होणाऱ्या प्रकरणांच्या निर्धारणेचा कालावधी ३ वर्षाऐवजी ५ वर्षांपर्यंत वाढविण्याचे मी प्रस्तावित करीत आहे. याकरिता मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ मध्ये यथोचित सुधारणा मी सूचवत आहे.

ऊस खरेदी कर अधिनियम सुधारणा

**२९.** आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तसेच भारतीय बाजारपेठेत साखरेचे भाव खाली आलेले आहेत. त्यामुळे साखर उद्योग आर्थिक अडचणीत आलेला आहे. या अडचणीवर मात करण्यासाठी साखर उद्योगाला राज्य शासनाने २००२-२००३ या गळीत हंगामातील ऊस खरेदी कर माफ करण्याचा विचारपूर्वक निर्णय घेतलेला आहे. तसेच जानेवारी २००२ ते सप्टेंबर २००२ या कालावधीत निर्यात केलेल्या साखरेतील ऊस खरेदी कराची माफी देण्यासंदर्भात राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे. या करिता ऊस खरेदीकर अधिनियमात दुरूस्ती मी सुचवत आहे.

विद्युत शुल्कात वाढ

**३०.** मुंबई विद्युत शुल्क अधिनियम, १९५८, मधील तरतूदीनुसार वीज वापर आकारावर (यामध्ये वीज आकार,

कमाल मागणी आकार आणि इंधन आकार यांचा समावेश आहे.) विद्युत शुल्क आकारले जाते. निवासी ग्राहक आणि खाजगी शैक्षणिक संस्था यांच्या बाबतीत गेल्या ६ वर्षामध्ये विद्युत शुल्काच्या दरामध्ये वाढ केलेली नाही. त्या ग्राहकांच्या बाबतीत प्रचलित विद्युत शुल्काचे दर १० टक्क्यावरून १२ टक्क्यापर्यन्त वाढविण्याचा प्रस्ताव आहे. त्याचप्रमाणे वाणिज्य ग्राहक, खाजगी दवाखाने, जाहिराती यांच्याबाबतीत १ वर्षापूर्वीच विद्युत शुल्काचे दर सुधारित केले असले तरी वाढीव साधनसंपत्ती मिळविण्याच्या दृष्टिने प्रचलित विद्युत शुल्काचे दर १२ टक्क्यावरून १३ टक्क्यापर्यन्त वाढविण्याचा प्रस्ताव आहे. ही दरवाढ दिनांक १ एप्रिल, २००३ पासून करण्यात येईल.

मुद्रांक शुल्कात सवलती.

**३१.** मुद्रांक व नोंदणी विभागाचे संपुर्ण संगणकीकरण खाजगी सहभाग तत्वावर पूर्ण करण्यात आले असून त्यामुळे ग्राहकांना अधिक उत्तम सेवा पूरविल्यामुळे महसूलात भरीव वाढ झालेली आहे. यापद्धतीचे अनुकरण कर्नाटकसह इतर राज्यांनी सुरू केलेले आहे. इतर राज्यांच्या तुलनेने या राज्यात मुद्रांक शुल्काचे दर—विशेषत: गृहयोजनांसाठी—कमी आहेतच. तथापि राष्ट्रीय गृह धोरणाप्रमाणे यात वेगवेगळ्या टप्प्यात दोन टक्के पर्यंत सवलत देण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्यात येत आहे. शेतकऱ्यांसाठी सिंचनाखालील शेतजमिनीसाठी मुद्रांक शुल्क दरात दोन टक्के कपात करण्यात येत आहे. गहाण खतांवरील मुद्रांक शुल्काची कमाल मर्यादा दहा लाखावरून पाच लाख करण्याचे प्रस्तावित आहे. बऱ्याच वस्तुंच्या वायदे बाजारास केंद्र शासनाने परवानगी दिली असल्याने हळद, तेलबिया यासारख्या वस्तुंच्या व्यवहारासाठी सुसूत्रित दर रु. दहा हजार

किंवा त्याच्या भागास दहा पैसे करण्याचा संकल्प आहे. तथापि या व्यवहारांना चालना देण्यासाठी तीन वर्षांसाठी मुद्रांक शुल्कातून सुट देण्याचे प्रस्तावित आहे. जुन्या दस्तांवर मुद्रांक शुल्क भरून घेण्यासाठी अभय योजना (Amnesty Scheme) प्रस्तावित आहे. जनतेला अधिक चांगल्या सेवा पुरविण्यासाठी नोंदणी कार्यालय नसलेल्या महसूल तालुक्यात ९३ ठिकाणी नवीन नोंदणी कार्यालय सुरू करण्याचा प्रयत्न राहील. तसेच चुकविलेल्या मुद्रांक शुल्काची माहीती देणाऱ्या व्यक्तिस बक्षिस योजना राबविण्यात येईल.

मुद्रांक शुल्क व नोंदणी फी आकारणीमधील वाढ.

**३२.** नोंदणी फी व नोंदणी शुल्कासंबंधीच्या खालील बाबी प्रस्तावित आहेत.

(१) नोंदणी फी माफीच्या सवलती रद्द करणे.

(२) नोंदणी फीची मर्यादा रु. २०,००० वरून रु. ३०,००० पर्यंत वाढविणे.

(३) टी.डी.आर. वरील मुद्रांक शुल्काची काटेकोर अंमलबजावणी करणे.

(४) डिपॉझिट ऑफ टायटल डीड (Equitable Mortgage) या दस्तऐवजांची नोंदणी सक्तीची करणे.

करमणूकीच्या काही प्रकारांवरील करमणूक शुल्काचे सुसूत्रीकरण

**३३.** मनोरंजन हा अतिशय वेगाने विकसित होणारा उद्योग आहे. मात्र इतर राज्यातील करमणूक शुल्काच्या कमी दरामुळे Live shows व करमणूकीच्या अन्य कार्यक्रमांचे आयोजन इतर राज्यांमध्ये करण्याकडे आयोजकांचा कल असल्याचे निदर्शनास आले आहे. मनोरंजनाच्या कार्यक्रमांची राजधानी हे

मुंबईचे स्थान अबाधित ठेवण्याच्या तसेच महाराष्ट्रातील मनोरंजन उद्योगाची पर्यटन उद्योगासह जलद वाढ व्हावी या दृष्टीकोनातून करमणूकीच्या काही प्रकारांवरील करमणूक शुल्काच्या कराचे सुसूत्रीकरण करण्यात यावे आणि या प्रकारांवरील अधिभार काढून टाकण्यात यावा असे मी प्रस्तावित करतो. यासाठी मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ मध्ये यथोचित सुधारणा करण्यात येईल.

परिवहन विभागाचे बळकटीकरण

३४. परिवहन विभागातर्फे सोळा सीमा तपासणी नाकी प्रस्तावित केलेली असून या नाक्यांवरून आत येणाऱ्या मालवाहू वाहनांची व विशेषत: त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक माल भरलेला असल्यास त्याची तपासणी करण्यात येते. इतर काही राज्यातील अनुभव लक्षात घेऊन या सर्व नाक्यांचे आधुनिकीकरण व संगणकीकरण करण्याचे शासनाने ठरविले आहे. प्रत्येक नाक्यांवर अद्ययावत संगणकीय वजनकाटा असेल व सर्व नाकी परिवहन आयुक्तांच्या कार्यालयास जोडण्यात येतील, की ज्यामुळे होणाऱ्या कामावर देखरेख ठेवणे सोईचे जाईल. हे आधुनिकीकरण "बांधा, वापरा व हस्तांतर करा" या तत्वावर करण्याचे योजिले आहे व या पासून शासनास प्रतिवर्षी रुपये ७० कोटी एवढे अतिरिक्त उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा आहे. तसेच परिवहन विभागास जादा मनुष्यबळ देऊन अधिक बळकट करण्याचे प्रस्तावित आहे. प्रशासकीय सुधारणा केल्याने अंदाजे रु. ५० कोटीचा महसूल प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे.

उत्पादन शुल्क

३५. देशी विदेशी मद्यावरील उत्पादन शुल्क आकारणीतील तफावती दूर करण्याचा माझा मानस आहे. या सुसुत्रीकरणातून रुपये १७५ कोटीचा अतिरिक्त महसूल प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे.

३६. राज्याच्या आर्थिक परिस्थितीचे भान ठेवून व कर वाढवण्यास असलेल्या मर्यादा लक्षात घेता मी उत्पन्न वाढविण्याचा व राजकोषिय संतुलन राखण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. महाराष्ट्र राज्य आर्थिकदृष्ट्या सक्षम राहण्याच्या दृष्टीने माझ्या या प्रयत्नांस या सभागृहातील सन्माननीय सदस्यांचे व राज्यातील जनतेचे पाठबळ मिळेल याची मला खात्री आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**